# मुंबई विद्यापीठ

कालमर्यादा/अतितात्काळ

क्र.वि.नि.वि.वि/२३५/१७/२०१६,
मुंबई – ४०० ०३२,
६ जानेवारी २०१६.

विषय :– विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ११२०८ राज्यात नॅशनल असेसमेंट व ॲक्रीएशन कौन्सिल नॅक कडून मूल्यांकन पूर्नमूल्यांकन न करणा–या महाविद्यालये व विद्यापीठांवर कार्यवाही करणेबाबत

संदर्भ :– या कार्यालयाचे परिपत्रक क्र.वि.नि.वि.वि. २३५/१४/२०१५, २१ डिसेंबर, २०१५

परिपत्रक :–

उपरोक्त विषयांस अनुसरून या कार्यालयाकडील परिपत्रक उपरोक्त संदर्भ क्र. १ कडे आपले प्राधान्याने लक्ष वेधण्यात येत असून त्याचे तातत्काळ अवलोकन करावे.

तसेच आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, ज्या ज्या महाविद्यालयांना किमान ६ वर्षे पूर्ण झालेली आहेत व त्या त्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत नॅक मुल्यांकनाची कार्यवाही सुरू केली नाही, तसेच ज्यांनी ज्यांनी प्रथम मुल्यांकनानंतर ५ वर्षांनी पुर्नमुल्यांकनाची कार्यवाही सुरु केलेली नाही अशा महाविद्यालयांनी त्वरीत नॅक मुल्यांकन व पुर्नमुल्यांकन करून घेण्यासाठीचे प्रस्ताव लवकरात लवकर सक्षम प्राधिकरणाकडे पाठवावेत व त्या संदर्भातील अहवाल संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांचेकडे सादर करावे.

तथापि याउपरही आपणांकडून अशीच उदासीनता आणि हेतूतः विलंब लावून शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्तेला बाधा आनण्याचे आढळून आल्यास अथवा दिरंगाई/टाळाटाळ निदर्शनास आल्यास क्र. सहसं/उशि/कोविप/नॅक मुल्यांकन/२०१५/३४४४ दि. ३० नोव्हेंबर २०१५ अन्वये शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार तसेच विद्यापीठामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकांन्वये कळविल्यानुसार आपल्या संस्था/महाविद्यालयाचे असंलग्निकरणासाठी मा. संचालकां मार्फत तसेच विद्यापीठामार्फत शासनाकडे शिफारस केली गेल्यास त्यात आपण कसलेही आश्चर्य मानू नये. याकरिता **सोबत मा. संचालकांच्या दिनांक ३० नोव्हेंबर २०१५ च्या पत्रात नमूद केल्यानुसार सोबत देण्यात येत** असलेले लेखी बंधपत्र/प्रमाणपत्र भरून दिनांक ११ जानेवारी २०१६ पर्यंत संचालक, बि.सि.यु.डी. येथे सादर करावे.

मुंबई – ४०० ०३२
६ जानेवारी, २०१६

(डॉ. एम. ए. खान)
कुलसचिव .

प्रत :–

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.

C1/Kamal/Marathi/812016/235

## : प्रमाणपत्र :

मी, (नांव) डॉ. श्री./श्रीमती......... .......प्राचार्य .............महाविद्यालय ........कल्याण/ठाणे/नवी मुंबई/पनवेल,मु.पो.........ता. .......जि. .......असे प्रमाणित करतो/ करते की, आमच्या महाविद्यालयाचे दिनांक. ....... ........पर्यंत नॅक मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन /पुर्नपूर्नमूल्यांकन करुन घेणेसाठी कटिबध्द आहे व त्यानुसार कार्यवाही होणेची दृष्टीने देखील बांधील आहे. कार्यवाही करणे व .........या तारखेपर्यंत पूर्नमूल्यांकन करुन महाविद्यालयास तसा दर्जा प्राप्त करुन न घेतल्यास त्याचे संपूर्ण उत्तरदायित्व प्राचार्य या नात्याने माझे राहील, तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांचे परिपत्रक क्रमांक ससं/उशि/कोविप/न्यॅक मूल्यांकन/२०१५/३४४४, दिनांक ३०.११.२०१५ अन्वये कळविल्यानुसार आमच्या संस्था/महाविद्यालयाचे सदर प्रकरणी शासनाकडून असंलग्निकरण (Deaffiliation )करिता प्रस्तावित झाल्यास अथवा अशी कार्यवाही झाल्यास त्याचीही सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य, या नात्याने माझीच राहील, व त्या तारखेपासून प्राचार्य, या नात्याने माझे वेतन स्थगित केल्यास माझी कोणतीही हरकत अथवा तक्रार रहाणार नाही. असे मी हमीपूर्वक ठाम निश्चियाने तसेच कोणाच्याही दाबावाखाली न येता शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता व सुप्रशासन अबाधित राखण्याकरिता स्वखुषीने प्रमाणित करीत आहे.

स्थळ :

दिनांक :

प्राचार्य :
महाविद्यालयाचे नांव :
पत्ता :